<u>नि.दि.दा.क्र. 68/2020</u>
<u>**CNR-MHYA110021872020**</u>

# <u>नि. क्र. 31 खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज त्रयस्थ ईसम सुभाष रामा गायकवाड यांनी त्यांना प्रतिवादी म्हणुन दाव्यात समाविष्ठ करण्याकरीता केलेला आहे.

2. त्याचे असे कथन आहे की, दावा मिळकत त्याने प्रतिवादी तसेच शांताबाई व सुमनबाई यांचे कडुन दिनांक 22/10/2020 रोजी विकत घेवुन ताबा घेतलेला आहे. तसा करार झालेला आहे. तेव्हापासुन दावा मिळकत त्याच्या ताब्यात व उपभोगात आहे. वादीला त्याची माहिती असुनही दाव्यात त्यास पक्षकार केलेले नाही. म्हणुन त्याला दाव्यात पक्षकार करण्यासाठी विनंती केली आहे.

3. वादीने निशाणी क्र. 31 ला म्हणणे देवुन अर्जास विरोध केलेला आहे. त्याचे असे म्हणणे आहे की, दावा मिळकत आजही त्याचेच ताब्यात आहे. प्रतिवादींनी ती मिळकत अर्जदारास हस्तातरीत केलेली नाही. तसा त्यांना अधिकार सुध्दा नाही. यापुर्वी प्रतिवादींनी नि. क्र. 22 कडे अर्ज देवुन हिच मागणी केली होती. तो अर्ज नामंजुर झालेला आहे. आता परत केवळ कलम बदलवुन प्रतिवादीने हा अर्ज दिलेला आहे. नि. क्र. 22 वरील आदेश आजही कायम असुन त्यावर प्रतिवादी अथवा अर्जदारने अपील केलेले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज कलम 11 दि. प्र. सं. प्रमाणे बाधीत असल्याने खारीज करण्याची विनंती केली आहे. वादींचे ताब्यास अर्जदार सुभाष गायकवाड याचा त्रास व अडथळा झाल्यास त्यांना पक्ष करण्याचा हक्क अबाधीत आहे. अर्ज खोटा आहे. प्रतिवादी केवळ प्रकरण लांबवत असल्याने अर्ज रुपये 5,000/– दंड लावुन खारीज करण्याची विनंती केली आहे.

4. उभय पक्षकारांतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

5. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दावा कायम मनाईसाठी आहे. वादीने खरेदीखताआधारे दावा मिळकतीवर कब्जा सांगुन प्रतिवादी त्यास हरकत व अडथळा करीत असल्याचे कथन केले आहे. याउलट, प्रस्तुत अर्जदाराचे प्रतिवादीनी करारनाम्याने दावा मिळकतीचा कब्जा दिल्याचे कथन आहे. परंतु, तसा करारनामा त्याने दाखल केलेला नाही. परंतु त्याने ॲडव्होकेट अरुण गोविंदवार यांचेकडील नोटरी अनु. क्र. <u>1615/2020</u>, दिनांक 22/10/2020 रोजीच्या कराराने दावा मिळकत प्रतिवादीकडुन ताब्यात मिळल्याचे कथन केले आहे. तोच करार प्रतिवादींनी निशाणी क्र. <u>24/03</u> कडे यापुर्वीच दाखल केलेला आहे. त्याचे अवलोकनावरुन असे दिसुन येते की, सुभाष गायकवाड याला विक्री करायची ठरलेली मिळकत ही सर्व्हे क्र. 161/1/अ मधील अकृषीक (रा.मा.क्र. 04 एन.अे.पी. 36/87 दि. 25/01/88) नुसार 48

आर वगळुन उर्वरित 16 आर ही आहे. तर दावा मिळकत ही त्या सर्व्हे क्रमांकामधील, वादीचे खरेदीखताप्रमाणे (नि. क्र. 3/7) रा.मा.क्र. 04 एन.अे.पी. 36/87 दि. 25/01/88 नुसार 48 आर ही आहे. यावरुन दावा मिळकत व सुभाष गायकवाड याला विक्री करावयाची मिळकत ही वेगवेगळी असल्याचे दिसुन येते. जरी प्रस्तुत अर्जदारने दावा मिळकतीचा त्याचे कडे कब्जा असल्याचे सांगितले असले तरी तो ज्या कराराच्या आधारे कब्जा सांगत आहे त्या करारात वेगळीच मिळकत नमुद आहे.

6. कायम मनाईची दाद कोणा विरुध्द मागावयाची ही वादीची निवड आहे. दावा मिळकतीवर त्याचा कब्जा आहे की नाही हे त्याला प्रथम सिध्द करावे लागणार आहे व त्या नंतरच त्याला कायम मनाईची दाद मिळणार आहे किंवा नाही हे ठरणार आहे. सुभाष गायकवाड हा वादीचे कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा करतो असे वादीचे कथन नाही. केवळ तो म्हणतो म्हणुन त्याला दाव्यात पक्षकार करता येणार नाही. दावा मिळकतीवर वादीचा कब्जा आहे किंवा नाही हे प्रथम ठरणार असल्याने व त्यानंतरच कायम मनाईच्या दादीचा विचार केला जाणार असल्याने सुभाष गायकवाड हा दाव्यास आवश्यक पक्षकार नाही.

7. निशाणी क्र. 22 कडील अर्ज अशाच प्रकारचा असल्याने व त्याचा निकाल झाल्याने प्रस्तुतच्या अर्जास दि. प्र. सं. कलम 11 ची बाधा येते अशी वादीने हरकत घेतली आहे. तशी बाधा येत नसल्याचे जरी प्रस्तुत अर्जदारतर्फे विधिज्ञांनी युक्तीवाद केला असला तरी त्या अनुषंगे नमुद करणे आवश्यक वाटते की, प्रस्तुतचा अर्जदार प्रतिवादींचेच हक्काखाली दावा मिळकतीचा कब्जा घेतल्याचे कथन करत असल्याने व नि. क्र. 22 कडील अर्जातील वाद विषय व प्रस्तुत अर्जातील वाद विषय एकच असल्याने दि. प्र. सं. कलम 11 ची त्यास बाधा येते.

8. या सर्व बाबींचा विचार करता अर्ज फेटाळण्यास पात्र आहे. म्हणुन खालील प्रमाणे आदेश करण्यात येतो –

अर्ज फेटाळण्यात येतो.

Digitally signed by Avinash Madhukar Patil
Date: 2021.03.04 15:45:44 +0530

(अविनाश म. पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
उमरखेड

दिनांक : 04/03/2021